**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नाशिक विभागीय मंडळ, नाशिक-४२२००३**
**nsksec@rediffmail.com**

परिपत्रक कमांक /नाविमं /उमाअ २/ १७६८. दिनांक-२-११-२०२० / ०६/११/२०२०.

---

**संदर्भ-** १) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र. (२४३/१९)/एसडी-४, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि.०८ऑगस्ट२०१९.

२) परिपत्रक क्र.रा.मं. /पापुअ/पापुई/संशोधन /इ.११वीची विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजना / ४२४१, दि.१६/०८/२०१९.

३) शासन पत्र क्र.संकीर्ण १०२०/प्र.क्र.१६३/एसडी-२, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि.१६ऑक्टोबर २०२०.चे पत्र

४) शासन पत्र क्र. संकिर्ण-१०२०/प्र.क्र.१६४/एसडी-२, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक १६ ऑक्टोबर,२०२० चे पत्र

५) परिपत्रक क्रमांक रा.मं/पापुअ/पापुई/इ.१२वी मूल्यमापन आराखडा/ वेबसाईट/४३९८, दिनांक १९/१०/२०२०

**विषय-** इ.१२वीच्या भाषा व भाषेतर या विषयांचे सुधारित मूल्यमापन आराखडे, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना इत्यादींबाबत...

या परिपत्रकान्वये नाशिक विभागीय मंडळातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की, इयता १२ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमाची व नवीन पाठयपुस्तकांची अंमलबजावणी शैक्षणीक वर्ष २०२०-२१ पासून सुरू करण्यात आलेली आहे. तसेच इयत्ता १२ वी च्या भाषा व भाषेतर गटातील **मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती, जापनीज, पाली पकासो, महाराष्ट्री प्राकृत, मल्याळम, तेलगू, बंगाली, चायनिज, संस्कृत, अर्धमागधी, जर्मन, उर्दु, अरेबिक, तमिळ, रशियन, कन्नड सिंधी, स्पॅनिश, फ्रेंच, पंजाबी, पर्शियन, भूगोल तत्वज्ञान, संरक्षण शास्त्र, प्राणीशास्त्र व तंत्रज्ञान, गृहव्यवस्थापन,अन्नशास्त्र व तंत्रज्ञान, ग्रंथालय व माहितीशास्त्र व मानसशास्त्र आणि समाजशास्त्र** या विषयांच्या मूल्यमापन योजनेची अंमलबजावणीही शैक्षणीक वर्ष २०२० - २१ पासून सुरू करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयाव्दारे शैक्षणीक वर्ष २०२० -२१ पासून इयत्ता १२ वीची सुधारित मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आलेली आहे. मंडळाने विषय तज्ञांमार्फत शासन निर्णयातील निर्देशानुसार तयार केलेली तपशीलवार मूल्यमापन योजना, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना यास संदर्भ क्र. ३ व ४ च्या पत्रान्वये शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे निश्चित केलेल्या सुधारित मूल्यमापन योजना व तदनुषंगीक बाबींना अनुसरून राज्य मंडळामार्फत विषयनिहाय ऑनलाईन व्दारे प्रशिक्षण नजिकच्या काळात आयोजीत करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात विषय शिक्षकांना विषयनिहाय मूल्यामापन आराखडे व अन्य तपशील अवगत करून देण्यात येणार आहे. उपरोक्त प्रमाणे शासन मान्यताप्राप्त इ. १२ वीचे मूल्यामापन आराखडे, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना या परिपत्रकासह मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील सर्व सूचना आपल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयाव्यात. सदर वेबसाईटवरील परिपत्रकात दर्शविलेल्या मूल्यमापन आराखडयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक - ४२२००१

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी-**

१. शिक्षण उपसंचालक नाशिक.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार.
३. जिल्हा परिषद नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार.